दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक १८ • Title - Code :- MAHMAR4951 • गुरुवार दि.०५ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून पालकमंत्रिपदाची यादी जाहीर, दादांच्या ७ मंत्र्यांना जबाबदारी, ३ जिल्ह्यांचा तिढा कायम

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील १२ जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची सुधारीत यादी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज जाहीर केली आहे. या सुधारित यादीनुसार चंद्रकांत पाटील यांची पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरून उचलबांगडी करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पालकमंत्रिपद देण्यात आले आहे. त्याशिवाय कोल्हापूरचं पालकमंत्रिपद हसन मुश्रीफ आणि बीड जिल्ह्याचं पालकमंत्रिपद धनंजय मुंडे यांच्यकडे देण्यात आलेले आहे. त्याचवेळी नाशिक, सातारा आणि रायगडच्या पालकमंत्रिपदाविषयीचा तिढा अद्याप कायम आहे.राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारमध्ये अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा समावेश झाल्यानंतर सरकारमध्ये पालकमंत्रिपदावरून काहीसा वाद उद्भवला होता.



त्यामुळे पालकमंत्र्यांची यादी जाहीर करण्यात आली नव्हती.ही यादी निश्चित करण्यात आल्यानंतर त्यावर शिक्कामोर्तब करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे; तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंगळवारी सायंकाळी दिल्लीस गेले. याच दिल्लीभेटीत पालकमंत्रिपदाविषयीचा तोडगा निघाला.पुण्याचे तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली १९ मे रोजी समितीची पहिली बैठक झाली. त्यात एक हजार पाच कोटी रुपयांच्या विकास आराखड्याला मान्यता देण्यात आली. त्यानुसार कामांना सुरुवात होईल, अशी जिल्हा परिषदेसह प्रशासनाला अपेक्षा होती. मात्र, तसे झाले नाही. या बैठकीत भाजप आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्या शिवसेनेच्या सदस्यांना निधी वाटपाचे सूत्र ठरले होते. त्यानंतर जुलैमध्ये अजितदादा यांचा राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत सहभागी झाला आणि निधी वाटपाच्या सूत्रावरून तिढा सुरू झाला. सत्तेत सहभागी होण्यापूर्वी जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या प्रत्येक आमदाराला आठ ते बारा कोटी रुपयांचा निधी मिळत असल्याचे काही सदस्यांचे म्हणणे आहे. मात्र, भाजप आणि शिंदे गटाच्या सदस्यांना झुकते माप दिल्यास 'राष्ट्रवादी'च्या सत्तेतील आमदारांना निधी किती द्यायचा याचा तिढा सुटत नसल्याने तयार याद्यांना चंद्रकांतदादांनी मान्यता दिली नसल्याचे बोलले जात होते. त्यामुळे जुलैपासून कोणत्याच कामांना प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही.अजितदादांचे सत्तेत 'इनकमिंग' झाल्यानंतर जिल्ह्यात कोणत्या 'दादां'चे वर्चस्व असा प्रश्न निर्माण झाला होता. 'उपमुख्यमंत्री म्हणून बैठका घेण्याचा अधिकार आहे', असे सांगत पुणे जिल्ह्याच्या विविध प्रकल्पांचा अजितदादा सातत्याने आढावा घेत होते. दुसरीकडे, 'डीपीसी'मधून होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या कामांना मान्यताच मिळाली नाही.

**कोणत्या जिल्ह्याची जबाबदारी कोणत्या मंत्र्याकडे?**

- पुणे– अजित पवार
- अकोला– राधाकृष्ण विखे– पाटील
- सोलापूर– चंद्रकांत दादा पाटील
- अमरावती– चंद्रकांत दादा पाटील
- भंडारा– विजयकुमार गावित
- बुलढाणा– दिलीप वळसे–पाटील
- कोल्हापूर– हसन मुश्रीफ
- गोंदिया– धर्मरावबाबा आत्राम
- बीड– धनंजय मुंडे
- परभणी– संजय बनसोडे
- नंदूरबार– अनिल भा. पाटील
- वर्धा – सुधीर मुनगंटीवार

## ओबीसी जागर मोर्चाचे वरोरा येथे भव्य स्वागत

# भाजपा सरकारने ओबीसीसाठी अनेक योजना राबविल्या–डॉ.अंकुश आगलावे

**वरोरा । प्रतिनिधी**

भाजपा सरकारने ओबीसीसाठी अनेक योजना राबविल्याचे प्रतिपादन डॉ. अंकुश आगलावे यांनी ओबीसी जागर मोर्चाचे स्वागताच्या वेळी केले. डॉ. आगलावे यांच्या नेतृत्वात ओबीसी जागर मोर्चाचे भव्य स्वागत करण्यात आले. जागर यात्रेतील प्रदेश प्रभारी ओबीसी मोर्चा महाराष्ट्राचे डॉ. आशिषराव देशमुख, प्रदेश अध्यक्ष ओबीसी मोर्चा महाराष्ट्र संजय गाते, उपाध्यक्ष डी.डी. सोनटक्के, रविंद्र चव्हान, गजानन आस्वले, हरिश शर्मा जिल्हाध्यक्ष ग्रामीण भाजपा यांचा डॉ.आगलावे यांनी ग्रामगीता, भगवी टोपी व शाल देवून सत्कार करण्यात आले. महात्मा गांधी व लालबहादुतर शास्त्री यांचे जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर ला बापु कुटी येथून ओबीसी जागर मोर्चाचे सुरूवात करण्यात आली .



ओबीसी जागर मोर्चाचे दहा दिवासाची यात्रा असून वर्धा, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, नागपूर, अकोला, बुलढाणा व वाशिम या जिल्हयांमध्ये अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.नरेंद्र मोदी यांच्या केंद्रातील सरकार मधील मंत्रीमंडळात ३५ टक्के ओबीसी खासदाराचा समावेश आहे. ओबीसी वर्गासाठी कोणतेही मंत्रालय नव्हते, फडणवीस सरकारने ओबीसी मंत्रालय तयार करून २३८२ करोड ची तरतुद केली आहे. , तसेच नवोदय विद्यालय, सैनिक विद्यालय, मेडिकलमध्ये ओबीसींचा कोटा वाढवून महात्मा फुले योजनेची सुरूवात करण्यात आले. तसेच विश्वकर्मा योजनेतून ओबीसींना मोठा फायदा होणार आहे. जेईई, नीट, एमपीएससी यामध्ये ३५० ओबीसी विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण व शिक्षण देण्यात आले त्यातील १११ मुले उत्तीर्ण होवून उच्च पदावर कार्यरत आहे. ओबीसी वर्गासाठी दहा लाख मोफत घरे देण्याचा निर्णय मोदी सरकारने घेतला आहे. त्यातील तीन लक्ष घरे येत्या २ वर्षात पूर्ण करण्याचा संकल्प फडणविस सरकाने घेतला आहे.केंद्रीय मागास आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी पश्चिम बंगाल मधील ओबीसी आरक्षणाचा घोटाळा उघडीस आणून कायदयाप्रमाणे ओबीसीला आरक्षण मिळवून देण्याचे काम केले. तसेच २० राज्यात ओबीसी आरक्षणाविषयक अनेक बैठका घेवून ओबीसीचे आरक्षण घटनेप्रमाणे सुरू आहे कि नाही हे तपासून ओबीसींना न्याय दिला. यावेळी वरोरा ग्रामीण व शहराच्या वतीने येत्या निवडणुकीत हंसराज अहीर यांना विजयी करून कॅबिनेट पद व सुधिर मुगंटीवार यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद मिळवून देण्याचा संकल्प यावेळी डॉ. आगलावे यांच्या नेतृत्वात घेण्यात आला.ओबीसी जागर मोर्चाचे स्वागत करण्यास सर्वश्री डॉ. भगवान गायकवाड, रमेश राजुरकर, अहतेशामअली, सुरेश महाजन, करण देवतळे, नरेंद्र जीवतोडे, प्रा. मधुसूदन टिपले, ओम मांडवकर, डॉ. वझे तसेच भाजपा वरोरा ग्रामीण व शहरातील अनेक पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## जिल्हयात पेडीऑट्रीक फिजिओथेरपी युनिटचे उदघाटन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील ० ते १८ वर्षे वयोगटातील जन्मजात बालके/विद्यार्थी यांच्यामध्ये जन्मता असणारे आजार, शारीरिक व बौद्धिक विकासात्मक विलंब, वाढीतील दोष तसेच इतर बालपणातील आजारांची तपासणी, निदान निश्चिती, थेरपी व उपचार आपल्या जिल्ह्यामध्येच उपलब्ध असावे, यासाठी जिल्हाधिकारी संजय मिना यांच्या संकल्पनेतून नाविन्यपूर्ण उपक्रम अंतर्गत 'पेडीऑट्रीक फिजिओथेरपी युनिट' जिल्हा महिला व बाल रुग्णालय येथील पेडीऑट्रीक विभाग सुरू करण्यात आले आहे.



या फिजिओथेरपी युनिटचे उद्घाटन दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. यावेळी आमदार देवराव होळी, जिल्हाधिकारी संजय मिना, मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रमोद खंडाते, जिल्हा महिला व बाल रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. किलनाके, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ धुर्वे आदी उपस्थित होते.

डीईआयसी येथील उपलब्ध जागेमध्ये 'पेडीऑट्रीक फिजिओथेरपी युनिट' बनविण्यात आले असून बालकांसाठी आकर्षित रंगरंगोटी अंतर्गत सौंदर्यीकरण करण्यात आले आहे. त्यांना खेळीमेळीचा सहवास लाभावा तसेच बालकांची मानसिक आरोग्यस्थिती व्यवस्थित व्हावी व थेरपी करिता अनुकूल वातावरण मिळावे, हा यामागील हेतू आहे. फिजिओथेरेपीकरिता येथे बालकांच्या विकासात्मक वाढीसाठी आवश्यक वेगवेगळे साहित्य/उपकरणे उपलब्ध करण्यात आले आहे. नियमित फिजिओथेरेपीमुळे बालकांमध्ये आत्मविश्वास परत मिळण्यास मदत होऊ शकते. थेरेपी स्नायुमधील बदलांचे नकारात्मक प्रभाव कमी करण्यास मदत करते. जसे की स्नायू कडक होणे, स्नायूंची ताकद, लवचिकता, पोश्चर, गतिशीलता, दैनंदिन जीवनातील कार्यात्मक स्वातंत्र आणि एकूण जीवनाच्या गुणवत्तेत बदल होण्यास मदत मिळते. अनेकदा स्पेशल एज्युकेशन, स्पिच थेरेपी आणि आकुपेशनल थेरेपीचे एकत्रीकरण जीवन कौशल्यामध्ये प्रगती करते. प्रत्यक्षात फिजिओथेरेपीचे कौशल्य अनेक आहेत, ते कोणत्याही स्थितीवर उपचार करू शकतात. ज्यामुळे हालचाल, संतुलन किंवा समन्वय, हाताची पकड, बसणे, खेळतांना हाताचा वापर, स्ट्रेचिंग व्यायाम, संतुलित व्यायाम तसेच सामाजिक परस्पर संवादाच्या संधी, आर्थोपेडिक किंवा क्रीडा दुखापतीचे वैद्यकीयदृष्ट्या निदान ई समाविष्ट आहेत. तसेच बाळ उशिरा चालणे, उशिरा मान धरणे, वेळेत न रांगणे, हाता-पायाची कमी हालचाल, बाळाला उभे राहण्यास अडचण, सरळ चालण्यास अडचण ई गोष्टी बालकाच्या वयानुरुप नसल्यास बालरोग फिजिओथेरेपीची आवश्यकता आहे. यासाठी नागपूर येथील ज्येष्ठ बालरोग फिजिओथेरेपीस्ट तथा पुनर्वसन सल्लागार डॉ. मिनाक्षी वानखेडे इतर थेरेपिस्टसह दर महिन्याच्या पहिल्या व तिस-या आठवड्यातील शुक्रवारला पेडीऑट्रीक फिजिओथेरपी युनिट, डीईआयसी येथे उपलब्ध राहणार आहेत. दरम्यान बालकांची तपासणी, मुल्यांकन, गरजेनुसार थेरेपिचे नियोजन, थेरेपीमधील अल्प-दीर्घ उद्दिष्टे ठरविणे व बरेच काही बाबींचा नियोजन आहे. तसेच दर सोमवार-मंगळवार-बुधवार प्रशिक्षित थेरेपीस्टकडून नियमित फिजिओथेरेपी सत्रे असणार आहेत. सांधे घट्ट होणे, चालायला उशीर, मोटर विलंब (ग्रास आणि फाईन), आकलनाच्या समस्या, स्नायू कमकुवत होणे, डीले माईलस्टोन, मेंदूचा पक्षाघात, डाऊनसिंड्रोम, अतिचंचलता (एडीएचडी), स्वमग्न (ऑटीझम), आर्थोसमस्या, वाढीतील दोष, विकासात्मक विलंब व इतर शारीरिक समस्या असलेल्या बालकांना 'पेडीऑट्रीक फिजिओथेरपी युनिट' साठी संदर्भित करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आणि जिल्हा शल्य चिकित्सक यांनी केले आहे.

## घुग्घुसचे ना.मुनगंटीवार सेवा केंद्र आयुष्यमान कार्ड काढून देण्यात जिल्ह्यात आघाडीवर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

घुग्घुस येथील ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रातर्फे आयुष्यमान भव अभियाना अंतर्गतचे आतापर्यंत आयुष्यमान कार्ड हजारो लाभार्थ्यांचे मोफत काढून देण्यात आले आहे.



माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शनात व भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांच्या नेतृत्वात हजारो लाभार्थ्यांना आयुष्यमान कार्ड काढून देण्यात येत असल्याने ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात नागरिकांची आयुष्यमान कार्ड काढण्यासाठी रिघ लागली आहे.या योजने अंतर्गत सर्व सरकारी रुग्णालये व पॅनलमध्ये सामील रुग्णालयांमध्ये आयुष्यमान भारत योजनेच्या लाभार्थ्यावर उपचार केला जाईल. लाभार्थ्यांना प्रत्येकी ५ लाख रुपया पर्यंत आरोग्य विमा उपलब्ध होणार आहे.सर्व नागरिकांनी आयुष्यमान कार्ड काढावे असे आवाहन भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांनी केले आहे.

## ८ ऑक्टोबरला कवितेच्या घराचा पुरस्कार वितरण सोहळा व राष्ट्रीय काव्यसंगिती

**वरोरा । प्रतिनिधी**

कवितेसाठी वाहिलेल्या अभिनव अशा कवितेच्या घराचे बापुरावजी पेटकर काव्य पुरस्कार कवींना प्रदान करण्यात येणार आहेत. यात महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील कवी सहभागी होणार आहेत. बापुरावजी पेटकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त दि. ८ ऑक्टोबर रोजी कवितेचे घर, शेगांव ( बुद्रुक ) येथे पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.




साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी एकनाथ आव्हाड कवितेवर बोलू काही या सदरात विद्यार्थ्यांशी काव्यसंवाद साधणार आहेत. सोहळ्याचे अध्यक्षस्थान विदर्भ साहित्य संघांचे अध्यक्ष प्रदीप दाते भूषविणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक व अंमळनेर येथे होणाऱ्या ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, नागपूर विभागाचे शिक्षण उपसंचालक उल्हास नरड, सुप्रसिद्ध कवी व मराठी भाषा विभागप्रमुख स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील डॉ. पी. विठ्ठल, वर्ध्याचे प्रसिद्ध गझलकार विद्यानंद हाडके, अविनाश मेश्राम पोलिस उपनिरीक्षक, शेगांव उपस्थित राहणार आहेत.राष्ट्रीय काव्यसंगितीचे दोन सत्रराहणार आहे.या पुरस्कार वितरण सोहळ्याला व राष्ट्रीय काव्यसंगितीला मोठया संख्येने काव्यरसिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन कवितेच्या घरातर्फे केले आहे.

## शब्द वेध

### वाह रे 'आदर्श ! '

तू माझा ' बाप ' काढतोस  
मी तुझा बाप काढतो !  
कळतच नाही, आपल्या  
घाण राजकारणातून......  
लोकांसमोर आपण काय  
आदर्श (?) मांडतो !  
दिसून येते अखेर, कुणालाच  
तत्वा चे काही पडले नाही...  
एकही दिवस जात नाही असा  
की, टिव्ही तून हे, कधी  
(ओ) रडले नाही.....!!



सुभाष उसेवार  
९०११२६२४३९

# आनंदवनात बीजोत्सव २०२३ चे आयोजन

## कृषी महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम

**वरोरा । प्रतिनिधी**

आनंद निकेतन कृषी महाविद्यालय वरोरा , आनंदवन कृषी तंत्रनिकेतन आनंदवन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक सहा ते आठ ऑक्टोबर २०२३ दरम्यान आनंदवन येथे बीजोत्सव २०२३ चे आयोजन करण्यात आलेले आहे




महारोगी सेवा समितीच्या अमृत महोत्सवी वर्ष तथा आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्षाच्या पर्वावर सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.निसर्गातील उपलब्ध संसाधनाच्या अविवेकी वापरामुळे सध्याच्या परिस्थितीत हवामान बदल, पर्यावरणीय प्रदूषण, मातीचे धोक्यात आलेले आरोग्य आणि पर्यायाने मानवी आरोग्यासमोर उभी झालेली आव्हाने लक्षात घेता देशी बियाण्यांच्या संवर्धनाकरिता तसेच विषमुक्त शेतीची संकल्पना शेतकरी तथा विद्यार्थ्यांनी समजून घ्यावी याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन आनंदवनातील मंत्री हॉलमध्ये करण्यात आलेले आहे.या उत्सवा मधे देशी बियाण्यांचे प्रदर्शन, पर्यावरणाशी निगडित शाश्वत शेतीला पूरक अशा अनेक विषयांवर विविध तज्ञांचे मार्गदर्शन ,पर्यावरण पूरक अनेक परंपरागत पद्धतीचे प्रात्यक्षिक तथा भरड धान्य युक्त अनेक रुचकर चविष्ट पदार्थांची मेजवानी विद्यार्थी, शेतकरी तथा ग्राहक यांना मिळणार आहे. बीजोत्सवाचे उद्घाटन दिनांक ६ ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारी २ वाजता होणार असून उद्घाटक म्हणून डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला चे कुलगुरू माननीय डॉ शरद गडाख हे उपस्थित राहणार आहे. अध्यक्षस्थान डॉ विकास आमटे सचिव महारोगी सेवा समिती वरोरा हे भूषवतील तर विशेष अतिथी म्हणून डॉ. डी बी.उंदीरवाडे संचालक कृषी विस्तार डॉ पं. दे. कृ. वि. अकोला, डॉ. एस एस माने संचालक , शिक्षण डॉ पं. दे. कृ. वि. अकोला,शंकर तोटावार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी चंद्रपूर हे उपस्थित राहतील तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून पल्लवी आमटे, सुधाकर कडू विश्वस्त महारोगी सेवा समिती वरोरा, डॉ दिलीप पेशवे, सुभाष शर्मा , वसंत फुटाणे, प्राची माहूरकर इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी सर्वांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पोतदार यांनी केले आहे.

## मुलींच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे बल्लारपूर येथील किल्ले व परिसराची स्वच्छता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची),चंद्रपूरद्वारे बल्लारपूर येथील किल्ला व परिसराची स्वच्छता करण्यात आली. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते वसंत खेडकर, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची),चंद्रपूर येथील गटनिदेशक सुनिल मेश्राम, प्रभात होकम आदींची उपस्थिती होती.




कौशल्य, रोजगार व उद्योजकता विभागांतर्गत राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाद्वारे जिल्ह्यातील गडकिल्ल्यांची स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या अभियानाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन प्रमोद भेंडे तर आभार प्रभात होकम यांनी मानले. यावेळी प्रमोद भेंडे, रवीकिरण सोरते, सुशील महाजन, मोनाली मून, सुनीता डोंगरे, कांचन कुंटेवार, सुषमा मस्की, सुनील समर्थ, सुरेश लोणारे, आदी उपस्थित होते.

# उन्मादाला आवर आवश्यक

**गेल्या काही वर्षांपासून सार्वजनिक कार्यक्रमात डीजे आणि लेझरसारख्या साधनांचा मोठ्या प्रमाणामध्ये गैरवापर वाढलेला आहे. मर्यादेपेक्षा मोठ्या आवाजात डीजे वाजवल्यामुळे त्याचे दुष्परिणाम अनेकांना भोगावे लागतात. आपल्या आनंदासाठी दुसऱ्याच्या आनंदावर विरजण पडू नये यासाठी आयोजकांनी डीजे आणि लेझरचा वापर करताना मर्यादांचा भंग होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. शेवटी कुठलेही सण उत्सव आपण आनंदासाठीच साजरे करत असतो. ते दुसऱ्याच्या जीवावर बेतणार नाही ही काळजी घेण्याची जबाबदारी आयोजकांची आहे. कायदा मोडणाऱ्या मुजोरांवर प्रतिबंध घालण्याची जबाबदारी पोलीस प्रशासनाची आहे.**




सध्या उत्सवांचा माहौल आहे. सणासुदीचे दिवस असल्याने सर्वत्र आनंदीआनंद आहे. मागील महिन्यांपासून सणांची मालिका सुरू झाली ती याही महिन्यात कायम असणार आहे. आपल्या आवडीच्या सार्वजनिक गणेशोत्सवानंतर येणारा हाडपोक्या सार्वजनिक गणेशोत्सव, त्यानंतर नवरात्रोत्सव. सगळा धुमधडाका असणार आहे. वर्षभर आपण ज्या सणांची वाट बघतो. ते साजरे करताना मिळणारा आनंद काही औरच असतो .आपल्या धर्मशास्त्राप्रमाणे सण, उत्सव साजरे केलेच पाहिजे. तो आपला हक्क आहे. सण हे माणसाला, कुटुंबाला एका माळेत जोडणारे असतात. नाती जपणारे असतात.ती वृध्दिंगत करणारे असतात. त्यामुळे परस्परात स्नेह, आपुलकी, जिव्हाळा वाढतो. म्हणूनच तर आपल्या पूर्वजांनी सणांची प्रथा परंपरा सुरू केली.मात्र उत्सव साजरे करताना काही काळजी घेणे आपले कर्तव्ये आहे. अलीकडे सण उत्सवाच्या निमित्ताने सर्वत्र डीजे आणि लेझर बीमचा मोठ्या प्रमाणामध्ये वापर वाढला आहे .शासनाने ठरवून दिलेल्या मर्यादेत हे वापरणे योग्य आहे. परंतु उत्साहाच्या आनंदात आपण इतके बेफिकीर होऊन जातो की, अनेकदा शासनाच्या नियमांचे पालन करण्याची आठवण राहत नाही. जसा आपला आनंद महत्त्वाचा आहे. तसाच आपल्यामुळे दुसऱ्याच्या आनंदावर विरजण पडू नये याचीही काळजी आपण घेतली पाहिजे. आपल्या चुकांमुळे इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे आपले कर्तव्य आहे. अलीकडे नाचण्याच्या नादात डीजेचा आवाज इतका मोठा असतो की त्यामुळे अनेकांना व्याधींना समोरे जावे लागते. आयोजकाने कार्यक्रमाचे नियोजन करताना नियमांचे भान ठेवायला पाहिजे. प्रमाणापेक्षा मोठा आवाज कमजोर हृदयाच्या रोग्यांसाठी हानिकारक असतो. यामुळे हृदयविकार, रक्तदाब यांसारख्या रूग्णांना त्रास होतो याचे भान ठेवून डीजे वापरला पाहिजे. असे ऐकले आहे की, सलग २४ तास पाच डिसिबलने वाढलेला आवाज ऐकल्यावर हृदयविकार व अर्धांगवायूसारख्या आजाराला सामोरे जावे लागते. हृदयाची ठोके वाढणे, दम लागणे, निद्रानाश यासारख्या व्याधी या भयावह आवाजातून जन्माला येतात. आपल्या उत्साहामुळे दुसऱ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होणार असेल तर कंट्रोल केलेच पाहिजे. मर्यादित आवाज ठेवून डीजे वाजवायला हरकत नाही. लग्नाच्या वरातीतही मोठ्या आवाजामध्ये डीजे वाजण्याचे प्रमाण वाढलेले आहे . सार्वजनिक उत्सवातही डीजे मोठ्या प्रमाणात म्हणजे ठरलेल्या मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात वाजवला जातो. डीजेच्या कर्कश आवाजाने कान बधीर होतात.वयोवृद्ध आणि रुग्णांना मृत्यूच्या अप्रत्यक्षपणे मृत्यूच्या दाढेमध्ये आपण ओढत आहोत का? याचा आयोजकांनी निश्चितपणे विचार केला पाहिजे. सार्वजनिक उत्सवाचे नेतृत्व करताना शासकीय नियमांचे पालन केलेच पाहिजे. आणि त्या नियमांचे पालन योग्य रीतीने होते की नाही हे पाहण्याची जबाबदारी पोलीस प्रशासनावर आहे. पोलीस प्रशासनाने सुद्धा कोणी नियमांचा भंग करत असेल तर निष्पक्षपणे कारवाई करायला पाहिजे. डीजे वाजवण्यावर आक्षेप नाही. परंतु तो मर्यादित आवाजात लावायला पाहिजे. अनेक मंडळे पोलीस प्रशासनाला आम्ही शासकीय नियमांचे पालन करू असे लिहून देतात. परंतु नंतर आपल्या मनमर्जीने वागतात. दरवर्षी सार्वजनिक ठिकाणी डीजेच्या डेसिबलचा आवाज वाढतच चाललेला आहे. या मिरवणुकांमध्ये शिस्त पाळण्याची जबाबदारी ज्या पोलीस विभागावर असते ते पोलीस यंत्रणा मुकाटपणे हे सगळे बघत असल्याचे निरीक्षण आहे. यामुळे ध्वनी प्रदूषण तर वाढत आहेच पण बहिरेपणा, हृदयविकार, दृष्टीदोष, पांगळेपणा अशा व्याधी नागरिकांना गिफ्ट मिळत आहे. असे जर होत असेल तर सणांत डिजे वापरताना नक्कीच काळजी घेतली पाहिजे. उत्सवाचे हेतू आपल्याला खऱ्या अर्थाने समजून घेण्याची गरज आहे. उत्सवाच्या निमित्ताने विकृतीकडे घेऊन जाणारा उद्दामपणा आता कुठेतरी थांबायला पाहिजे. आज आपण कोणत्या गोष्टीला महत्त्व देत आहोत याचा विचार प्रत्येक नागरिकांनी करायला पाहिजे. राजकारण्यांचे जाऊ द्या. ते केवळ मतांवर डोळे ठेवून वर्तन करत असतात किंवा त्यांना त्यातील प्रगल्भता नसल्यामुळे ते दुर्लक्ष करत असेल. परंतु हृदयरोगासारख्या आजाराने ग्रस्त रुग्णांच्या जीवनाचा विचार करता आवाजावर बंधन यायलाच पाहिजे. डीजेच्या अमर्यादित वापरानंतर दुसरा त्रासदायक प्रकार म्हणजे लेझरच्या वापरामुळे डोळ्यांच्या नेत्रपटलाला गंभीर प्रकारच्या इजा होऊन काही अंशी अंधत्व आल्याच्या घटना वर्तमानपत्रामध्ये वाचायला मिळतात. मिरवणुकांमध्ये होणारा लेझरचा वापर घातक ठरत असल्याचे निरीक्षण आहे. हिरव्या लेझर दिव्याचा फ्रिक्वेन्सी अधिक असतो. ते लेझर डोळ्यावर पडले की नेत्र समस्या निर्माण होतात असे नेत्र तज्ज्ञांचे म्हणणे आहे. उन्हात कागदावर भिंग ठेवले की कागद ज्याप्रकारे पेट घेतो. त्याचप्रकारे लेझरचा डोळ्यावर परिणाम होत असावा असे काही डॉक्टरांना वाटते. लेझर लाईट हा डोळ्यांसाठी घातक ठरत असल्याने त्याचा मिरवणुकीसारख्या ठिकाणी शक्यतो वापर करू नये. लग्न वरातीमध्ये सुद्धा डीजेचा वापर मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. डीजेचा दणदणात काही काळासाठी जरी मनाला आनंद देणारा असला तरी तो क्षणिक आनंद असतो. त्यामुळे रुग्णांना कमवावी लागणारी किंमत आहे ती फार मोठी असते. डीजेच्या दणदणाटामुळे रक्तदाब वाढण्यासोबतच अर्धांगवायूचा झटका सुद्धा घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सार्वजनिक उत्सव कुठलाही असो. ती लग्नाची मिरवणूक असो की, धार्मिक उत्सव असो की, कौटुंबिक उत्सव असो. त्यामध्ये डीजे असो की लेझर लाईट असो मर्यादेपेक्षा अतिवापरावर बंदी असावी असे वाटते.

शेवटी सण असो, उत्सव असो, कौटुंबिक मिरवणूक असो हे सगळे आपण आपल्या आनंदासाठी करत असतो. क्षणिक आनंदाच्या मोहात पडून कुणाचे आयुष्य आपल्यामुळे खराब होणार नाही याची आयोजकांनी काळजी घेतलीच पाहिजे. आनंद साजरा जरूर करा. परंतु लोकांचे आरोग्य सांभाळून करा. आज या निमित्ताने आयोजकांना निवेदन करावेसे वाटते की, डीजे वापरा. जरूर वापरा. परंतु त्यामुळे शासकीय नियमांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्या. आणि पोलीस प्रशासनालाही विनंती करावीशी वाटते की, आपल्या उपस्थितीत डीजे चालक मर्यादा सोडून आवाज वाढवणार नाही याची काळजी घ्या. खोट्या लोकप्रियतेसाठी जनतेचा बळी घेऊ नका . कारण हेल्थ इज वेल्थ ,आरोग्य चांगले असेल तर जीवन जगण्याला अर्थ आहे. आरोग्यच चांगले नसेल तर असे व्याधीग्रस्त जीवन काय कामाचे? मानवनिर्मित कारणांमुळे येणाऱ्या व्याधी क्लेषदायक आहे. त्या आपल्याला टाळता येतात. शक्यतो हृदयरुग्णांनी डीजेच्या संपर्कात जाऊच नये. आयोजकांनी शक्यतो मर्यादेपेक्षा मोठ्या आवाजात डीजे वापरू नये. आ याचे कोणी उल्लंघन करत असेल त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्याची जबाबदारी पोलीस प्रशासनाची आहे. कुठल्याही राजकारणाच्या दबावात येऊन आपण आपल्या कर्तव्यात कसूर करू नये. शेवटी जीवन महत्त्वाचे आहे नाही का?

# तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स

आजच्या टेक्नोसॅव्ही युगात मोबाईल, आयफोन, टॅब्लेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप ही उपकरणे वापरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला स्टीव्ह जॉब्स हे नाव माहीत नसेल हे अशक्यच आहे. स्टीव्ह जॉब्स ज्याने ऍपल ही कंपनी सुरू केली आणि ती आज जगातील सर्वात यशस्वी कंपनी बनवली, त्याच ऍपल कंपनीचा संस्थापक, तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स यांचा आज स्मृतिदिन.स्टीव्ह जॉब्स यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९५५ रोजी अमेरिकेतील ग्रीन बे या गावी झाला. सिरियाचा मुस्लिम विद्यार्थी अब्दुल फतेह व जोहान शिबिल यांनी विवाहाआधी जन्मलेले मूल एका अनाथालयाला दिले. तेथून पॉल - क्लारा जॉब्स या आर्मेनियन कुटुंबाने त्याला दत्तक घेतले. दत्तक घेताना या कुटुंबाने या मुलाला पदवी पर्यंतचे शिक्षण देईल आणि सुखात ठेवेल असे वचन दिले; पण जॉब्स दांपत्य गरीब असून ते मजुरी करत आहेत, हे समजल्यावर स्टीव्हच्या मातापित्यांनी त्यावर आक्षेप घेतला. सहा महिन्यांच्या चर्चेनंतर ते स्टीव्हला जॉब्स दांपत्याला दत्तक द्यायला तयार झाले. स्वतः गरीब असून, मोलमजुरी करूनही जॉब्स दांपत्याने दिलेले वचन पूर्ण केले. लहानपणी स्टीव्ह एकलकोंडा होता. आपण कोणालाच नको आहोत, अशी त्याची भावना बनली होती. हायस्कूलमध्ये असताना स्टीव्हला ह्युलेट पॅकर्ड या कारखान्यात काम करण्याची संधी मिळाली. जिथे त्याची स्टीव्ह व्होजनियाकसोबत ओळख झाली. तेंव्हा स्टीव्ह जॉब्स १६ वर्षाचा तर स्टीव्ह व्होजनियाक २१ वर्षाचा होता. दोंघांची मैत्री होण्याचे कारण म्हणजे दोघांना तंत्रज्ञानाची आवड होती. व्होजनियाकने व्हिडिओ गेमचा टेलिटाईप व मायक्रोप्रोसेसर बनवला होता. स्टीव्ह जॉब्सला त्याच्यावर खूप विश्वास होता. १९७० नंतर कॉम्प्युटर क्षेत्रात नवनवे बदल व प्रयोग होत होते. नवनिर्मितीचा ध्यास असणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांनी ही संधी साधून १९७६ मध्ये व्होजनियाकवर कॉम्प्युटर निर्मितीची जबाबदारी सोपवली आणि स्वतः मार्केटमध्ये लक्ष घातले. कॉम्प्युटर तयार झाला. कंपनी देखील बनली. कंपनी रजिस्टर करायची पण कोणत्या नावाने हा प्रश्न होता. अनेक नावे समोर आली पण ती स्टीव्हला पसंत पडली नाही. त्याच्या घरासमोर सफरचंदाचे झाड होते. एका सकाळी त्याने झाडाचे सफरचंद तोडून खायला सुरवात केली आणि त्याला कंपनीचे नाव सुचले ऍपल. पुढे याच नावाने कंपनी रजिस्टर झाली. त्यांना लगेच ५० कॉम्प्युटरची ऑर्डरही मिळाली. अशा प्रकारे वयाच्या २१ व्या वर्षीच कॉम्प्युटर क्षेत्रात शिरला आणि एका कंपनीचा मालक बनला. त्याच्याकडे तंत्रज्ञानाची पदवी नव्हती ; पण कल्पना होत्या. मॅनेजमेंटचे कौशल्य होते. त्याने तंत्रज्ञानात तरबेज असणारी माणसे निवडली. बाजारपेठेच्या गरजेची नस पकडत त्याने एकापेक्षा एक अत्याधुनिक आणि सरस उत्पादने धुमधडाक्यात उतरवली. त्याने बाजारपेठेत आणलेल्या ऍपल १ पीसी या पर्सनल कॉम्प्युटरला खूप मागणी होती. कंपनी चालवताना स्टीव्ह ने अनेक धडाकेबाज निर्णय घेतले; पण हे करताना त्याने अनेकांची मने दुखावली. त्यामुळे सहकाऱ्यांशी त्याचे मतभेद वाढले. शेवटी त्याने आपणच स्थापन केलेली ऍपल कंपनी सोडली. १९८६ मध्ये त्याने चित्रपट दिग्दर्शक जॉर्ज लुकास सोबत भागीदारी करून एक कंपनी स्थापन केली. त्या कंपनीचे नाव पिक्सार असे होते. या कंपनीने ऍनिमेशन सिनेमे बनवले. ते खूप गाजले. या कंपनीने वॉल्ट डिस्ने सोबत करार केल्याने या कंपनीने खूप पैसे कमावले. इकडे स्टीव्ह जॉब्स सोडून गेल्यापासून ऍपल कंपनी मात्र तोट्यात आली. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांपुढे ऍपलचा निभाव लागत नव्हता. अखेर १९९७ ला स्टीव्ह जॉब्स पुन्हा ऍपलमध्ये परतले. आपल्या कल्पक बुद्धीने त्यांनी ऍपलला पुन्हा अव्वल स्थानी पोहचवले. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांनी कॉम्प्युटरमध्ये मक्तेदारी सिद्ध केल्याने काही तरी नवे करण्याची उर्मी स्टीव्हला आली त्यातूनच त्याने आयफोन, आयपॉड, आयपॅड बाजारात सादर केले. त्यांच्या या दुरदर्शीपणाला जगाने सलाम केला. २००१ मध्ये ऍपलने ५ गिगाबाईट क्षमतेचा आयपॉड तयार केला. हा सर्वात लहान म्युजिक प्लेयर होता. त्यात एक हजार गाणी स्टोअर करता येत. हा आयपॉड अल्पावधीतच लोकप्रिय झाला. या आयपॉडने वॉकमनला कायमचे घरी बसवले. २००७ मध्ये ऍपलने टचस्क्रीन मोबाईल मार्केटमध्ये आणला. टचस्क्रीन आणि अतिशय सोप्या इंटरफेसमुळे तो खूप लोकप्रिय झाला. थ्री जी मोबाईल देखील ऍपलनेच सर्वप्रथम सर्वात आधी मार्केटमध्ये आणला. २०१० मध्ये आलेल्या पहिल्या टॅबलेट पीसीने जगभरातील गॅजेट प्रेमींना वेड लावले. सतत नवीन काहीतरी करून तंत्रज्ञानात आपले वर्चस्व निर्माण करणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांना भारताविषयी खूप प्रेम होते. ते अनेकदा भारतात येऊन गेले. भारतातील अध्यात्म आणि बौद्ध धर्माविषयी त्यांना खूप कुतूहल होते. नवनिर्मितीचा ध्यास, तंत्रज्ञानाची आवड, मार्केटिंगमधील कौशल्य, सतत शिखरावर राहण्याची जिद्द या गुणांमुळे स्टीव्ह जॉब्स हा जागतिक कीर्तीचा तंत्रज्ञ ठरला. त्याचा प्रतिस्पर्धी मायक्रोसॉफ्ट कंपनीचा मालक बिल गेटदेखील त्याच्या या गुणांची कदर करायचा. बिल गेटने तर त्याला आधुनिक युगाचा एडिसन अशी पदवी दिली. ५ ऑक्टोबर २०११ रोजी वयाच्या अवघ्या ५६ व्या वर्षी तंत्रज्ञानाच्या या बादशहाने जगाचा निरोप घेतला. तंत्रज्ञानाच्या या बादशहाला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# अर्थकारण की धर्मकारण?

आर्थिक संकटांमधून पूर्णपणे बाहेर येण्यासाठी तुर्कीयेने आर्थिक संबंधांमध्ये विविधता आणली पाहिजे. ही विविधता भारत तसेच पाश्चात्त्य देशांशी सलोख्याचे संबंध विकसित करूनच येऊ शकते. तथापि, त्याला वेळ लागेल, असे दिसते.जागतिक राजकारणात महत्त्वाचे स्थान असलेला तुर्कीये (आधीचा तुर्कस्तान) सध्या आर्थिक संकटाचा सामना करीत आहे. आशिया आणि युरोप यांना जोडणारा दुवा तसेच पश्चिम आशिया, युरेशिया आणि उत्तर आफ्रिका या प्रांतांच्या मध्ये स्थित तुर्कीयेला व्यूहात्मक महत्त्व आहे.आत्तापर्यंत तुर्कीयेने आपल्या भौगोलिक स्थितीचा उपयोग आर्थिक फायद्यासाठी बऱ्याच वेळा केला आहे. परंतु गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या आर्थिक संकटांसमोर व्यूहात्मक धोरणाचा समतोल राखणे तुर्कीयेला अवघड होत चालले आहे.

२०१८ पासून तुर्कीयेला आर्थिक समस्या भेडसावत आहेत. तुर्कीयेचे चलन लिराची डॉलर समोर घसरण, वाढती महागाई आणि वाढते व्याजदर यामुळे तुर्कीयेची अर्थव्यवस्था कमकुवत झाली आहे. आर्थिक संकटांसाठी तुर्कीयेचे राष्ट्रपती रजब तय्यीप एर्दोगान यांच्या धोरणांना जबाबदार धरण्यात येते. परंतु एकूण परिस्थिती विरोधात दिसत असताना सुद्धा एर्दोगान या वर्षी मे महिन्यात झालेल्या निवडणुकांमध्ये विजयी झाले.एर्दोगान पुन्हा राष्ट्राध्यक्ष झाल्यावर तुर्कीयेची आर्थिक संकटं अधिक गंभीर झाली आहेत. जूनपासून लिराची डॉलरच्या तुलनेत २० टक्के घसरण झाली आहे. तुर्कीयेचे अर्थ मंत्री मेहमेत शिमशेक यांनी ‘फायनान्शियल टाइम्स’ या वृत्तपत्राला नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, सरकार प्रयत्नशील असून सुद्धा अर्थव्यवस्थेत प्रगती व्हायला अजून वेळ लागणार आहे. निर्यात आणि गुंतवणूक वाढविणे आवश्यक असल्याचे शिमशेक म्हणाले.या पार्श्वभूमीवर तुर्कीयेच्या परराष्ट्र धोरणाची दिशा महत्त्वाची आहे. गेली अनेक वर्षे तुर्कीये आणि अरब देश यांच्यामध्ये मुस्लिम विश्वात वर्चस्वासाठी संघर्ष सुरू होता. आर्थिक दृष्टीने समृद्ध असलेले अरब देश आणि सामरिक दृष्टीने महत्त्वाचे भौगोलिक स्थान असलेला तुर्कीये हे दोन्ही गट क्षेत्रीय आणि जागतिक राजकारणात आपला प्रभाव वाढविण्यासाठी पावले उचलीत होते.पण देशाची आर्थिक बाजू सावरण्यासाठी एर्दोगान आता अरब देशांशी तुर्कीयेचे संबंध सुधारण्यासाठी प्रयत्नशील आहेत. जुलै महिन्यात त्यांनी सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात आणि कतार या अरब देशांचा दौरा केला. निर्यात आधारित अर्थव्यवस्था असलेल्या अरब देशांसाठी तुर्कीये एक महत्त्वाची बाजारपेठ आहे. तर तुर्कीयेसाठी अरब देश गुंतवणुकीचा एक महत्त्वाचा स्रोत आहेत.



पाश्चात्त्य देशांशी संबंध ताणलेले

आर्थिक क्षेत्राप्रमाणे भू-राजकीय क्षेत्रात हे दोन गट किती सहयोग करतात हे महत्त्वाचे आहे. सीरियाच्या गृहयुद्धात तुर्कीये आणि सौदी अरेबिया हे सीरियाचे राष्ट्राध्यक्ष बशर अल असद यांच्या विरोधात एकत्र होते. आता सीरियाचे अरब देशांशी संबंध सुधारले आहेत. पण तुर्कीयेचा सीरियाशी अजूनही संघर्ष सुरू आहे, जो तुर्कीयेचे स्वतंत्र धोरण जपण्याचा एक प्रयत्न आहे.दुसरीकडे पश्चिमी देशांशी तुर्कीयेचे संबंध गुंतागुंतीचे होत चालले आहेत. ‘नाटो’चा सदस्य असलेल्या तुर्कीयेची रशिया-युक्रेन युद्धात महत्त्वाची भूमिका आहे. तुर्कीयेने रशिया आणि युक्रेन यांच्यात शांततेसाठी मध्यस्थी केली होती. तसेच संयुक्त राष्ट्राच्या नेतृत्वाखाली काळा समुद्रातून युक्रेनहून निर्यात होणाऱ्या धान्याची वाहतूक तुर्कीयेच्या बोस्फोरस आणि दार्दानेल्लेस या सामुद्रधुनीतून होते.पण स्वीडनला ‘नाटो’चे सदस्यत्व मिळण्याच्या मुद्द्यावर अजूनही तुर्कीये आणि पश्चिमी देश यांच्यात मतभेद आहेत. अमेरिकेकडून एफ-१६ लढावू विमाने मिळाल्यास तुर्कीये स्वीडनच्या ‘नाटो’ प्रवेशाला परवानगी देईल, अशी एर्दोगान यांची भूमिका आहे. तसेच युरोपीय संघांचे सदस्यत्व तुर्कीयेला मिळावे म्हणून एर्दोगान अनेक वर्षे प्रयत्नशील आहेत.पण युरोपीय संसदेच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या एका अहवालात तुर्कीयेतील मानवाधिकारांचे उल्लंघन आणि रशियाशी असलेल्या संबंधांबद्दल टीका करण्यात आली होती. यावर एर्दोगान यांनी तुर्कीयेने युरोपीय संघाशी संबंध कसे ठेवायचे याचा निर्णय आपण करू, असे सांगितले.पाश्चात्त्य देशांशी तुर्कीयेचे संबंध सामान्य होणे नजीकच्या भविष्यात तरी कठीण दिसत आहे. तर भारताच्या बाबतीतही तुर्कीयेकडून मिश्र संकेत मिळत आहेत. काश्मीर मुद्द्यावरून तुर्कीयेने पाकिस्तानला पाठिंबा दिल्यामुळे गेली अनेक वर्षे तुर्कीयेचे भारताशी संबंध तणावपूर्ण राहिले आहेत. तुर्कीयेमध्ये वाढत्या धार्मिक कट्टरतावादाचा एक परिणाम म्हणजे तुर्कीयेकडून काश्मीर मुद्द्यावर भारतावर टीका आणि आरोप करणे.२०१९ पासून एर्दोगान संयुक्त राष्ट्रामध्ये काश्मीरचा मुद्दा उपस्थित करत आले आहेत. या वर्षीच्या संयुक्त राष्ट्राच्या बैठकीत सुद्धा एर्दोगान यांनी काश्मीरचा उल्लेख केला होता. पण पूर्वीच्या तुलनेत एर्दोगान कमी आक्रमक होते. तसेच अप्रत्यक्षरीत्या एर्दोगान यांनी काश्मीर हा भारत-पाकिस्तान यांच्यातला द्विपक्षीय मुद्दा असल्याचे सांगितले. ही भूमिका भारताच्या भूमिकेशी जुळणारी आहे.

भारताशी मैत्रीला विलंबच

जी-२० शिखर परिषदेसाठी भारतात आले असताना एर्दोगान यांनी तुर्कीयेचा दक्षिण आशियामधील सर्वात मोठा व्यापार भागीदार म्हणून भारताचे कौतुक केले होते. पण तुर्कीयेचे भारताशी संबंध सलोख्याचे व्हायला वेळ लागेल. जी-२० शिखर परिषदेमध्ये भारत- पश्चिम आशिया- युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉरची घोषणा झाली.समुद्र आणि रेल्वे मार्गे हा कॉरिडॉर भारताला पश्चिम आशिया आणि युरोपमधील देशांना जोडेल. या कॉरिडॉरची घोषणा झाल्यानंतरच्या काही दिवसांनंतर एर्दोगान यांनी तुर्कीयेला या प्रकल्पातून बाहेर ठेवल्यामुळे नाराजी व्यक्त केली. तसेच एर्दोगान यांनी या कॉरिडॉरचा पर्याय म्हणून इराक विकास मार्ग या प्रकल्पाचा प्रस्ताव मांडला. यामध्ये तुर्कीयेव्यतिरिक्त इराक, कतार आणि संयुक्त अरब अमिराती या देशांचा समावेश करायचा विचार त्यांनी मांडला.हा फक्त एका प्रकल्पाला पर्याय म्हणून दुसरा प्रकल्प नाही; तर भारताचे भू-मध्य सागर क्षेत्रातल्या देशांशी मजबूत होत असलेल्या संबंधांना रोखण्याचादेखील प्रयत्न आहे. आर्थिकदृष्ट्या जरी भारताशी मैत्री तुर्कीयेच्या हिताची असली तरीही धोरणात्मक दृष्टीने तुर्कीये अजून त्या मैत्रीसाठी मानसिकदृष्ट्या तयार नाही.भारताप्रमाणेच चीनबरोबरच्या तुर्कीयेच्या संबंधांत इस्लाम हा एक प्रमुख मुद्दा होता. चीन आपल्या शिंजियांग प्रांतातल्या उइघर मुसलमानांवर अनेक बंधने घालत आला आहे. उइघर हे तुर्कीये मूळचे मुसलमान असल्यामुळे तुर्कीयेसाठी ही अतिशय संवेदनशील बाब आहे. चीनच्या बाहेर सगळ्यात जास्त उइघर तुर्कीयेमध्ये राहतात.चीनकडून उइघर मुसलमानांना मिळणाऱ्या वागणुकीमुळे तुर्कीये आणि चीन यांच्यात खटके उडाले आहेत. पण इथेही आर्थिक पक्ष धार्मिक बाबींवर वरचढ ठरला आहे. चीनने तुर्कीयेच्या अनेक पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये गुंतवणूक केली आहे. इस्तंबूल-अंकारा या शहरांना जोडणारी रेल्वे लाईन चीनच्या आर्थिक सहायतेमुळे साकार झालीयाशिवाय चीनने बंदरांचा विकास, कोळसा ऊर्जा प्रकल्प, दूरसंचार इत्यादी क्षेत्रातही तुर्कीयेमध्ये गुंतवणूक केली आहे. अरब देशांशी संबंध सुधारण्यामुळे तुर्कीयेच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. पण आर्थिक संकटांमधून पूर्णपणे बाहेर येण्यासाठी तुर्कीयेने आर्थिक संबंधांमध्ये विविधता आणली पाहिजे. ही विविधता भारत तसेच पश्चिमी देशांशी सलोख्याचे संबंध विकसित करूनच येऊ शकते.पण चीनबरोबरचे संबंध तुर्कीयेसाठी भारत आणि पाश्चात्त्य देशांना शह देण्याचे साधन आहे. त्यामुळे भारत आणि पश्चिमी देशांच्या बाबतीत सध्या तरी तुर्कीये आर्थिक सहकार्यापेक्षा धोरणात्मक स्वायत्ततेला प्राधान्य देताना दिसतो आहे.

## भद्रावतीत गणरायाचे थाटात विसर्जन

# शिवसेना (उबाठा) वतीने जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी केले गणेश मंडळाच्या सदस्यांचा स्वागत व सत्कार

**भद्रावती । प्रतिनिधी**

गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, म्हणत भद्रावतीसह तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या हजारो भाविकांनी दिनांक २९ सप्टेंबर रोजी गणपती बाप्पाला अखेरचा निरोप दिला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे व समस्त शिवसैनिकांनी गांधी चौक येथे स्वागत मंच तयार करून सार्वजनिक गणेश मंडळाच्या सदस्यांचे स्वागत तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा फोटो देऊन सत्कार केला.

भद्रावती शहरातील सार्वजनिक गणेश मंडळाचे विसर्जन भव्य मिरवणुक काढून हजारो भाविक भक्ताच्या अलोट गर्दीत बाप्पांना अखेरचा निरोप देत मोठ्या थाटात पार पडले. कुठे डीजेचा ताल तर कुठे ढोलताशांचा कडकडाट आणि त्यावर बेधुंद होऊन ताल धरणारा तरुण वर्ग व भव्य मिरवणूक विशेष आकर्षण ठरले. या विसर्जन विसर्जन मिरवणुकीत





सहभागी भाविक भक्ताचे तसेच सार्वजनिक गणेश मंडळ व त्यांच्या सदस्यांचे स्वागत करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात भव्य स्वागत मंच उभारण्यात आला होता. मिरवणूक स्वागत मंचाजवळ पोहोचतच सर्व सार्वजनिक गणेश मंडळाचे स्वागत तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या फोटो देऊन सत्कार केला व बाप्पाला अखेरचा निरोप देण्यासाठी आलेल्या चिमुकल्यांना चॉकलेटचे वाटप केले.यावेळीउपजिल्हा प्रमुख तथा माजी नगरसेवक वसंता मानकर, उपजिल्हा प्रमुख अमित निब्रड, विधानसभा संघटक सुधाकर मिलमिले, तालुका संघटक बाळा क्षीरसागर, युवासेना जिल्हा सनमव्यक दिनेश यादव,माजी तालुका प्रमुख बंडू चटपल्लीवार,युवासेना उपजिल्हा प्रमुख महेश जिवतोडे,शिवदूत बंडुजी डाखरे, उपतालुका प्रमुख मंगेश ढेंगळे,विधानसभा मीडिया प्रमुख गणेश चिडे,युवासेना शहर प्रमुख पियुष सिंग,स्वप्नील एकरे, राहुल खोडे,जितेंद्र गुल्हानी,सर्फराजखान पठाण,अभिजित शिंदे, अरविंद खोबरे, दत्तूजी बोहसरे, सुरज डाखरे महिला संघटिका उपजिल्हा सनमव्यक कीर्तीताई पांडे,वंदना उईके, सुनीता खंडाळकर, वरोरा शहर प्रमुख संदीप मेश्राम, तालुका प्रमुख विपीन काकडे, उपशहर प्रमुख मनिष दोहतरे,कामगार सेना तालुका प्रमुख हनुमान ठेंगणे,बंडू पाटेकर,राकेश टापरे,चेतन किन्हेकर व आदी शिवसैनिक, युवासैनिक, महिला आघाडी, युवतीसेना व आदी उपस्थित होते.

## वनपरिक्षेत्र चामोर्शीच्या कर्मचाऱ्यांनी बांधला वनराई बंधारा




**चामोर्शी । प्रतिनिधी**

वन विभाग अल्लापल्ली अंतर्गत येणाऱ्या वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय चामोर्शी , उपवनपरिषेत्र कार्यालय भाडभिडी ( बि. )आणि शहीद बाबुराव शेडमाके ज्युनियर कॉलेज आमगाव ( म ) यांच्या संयुक्त विद्यमाने दत्तटेकडी ( डोंगरसर ) जवळील नाल्यावर वनराई बंधारा बांधून वन्य जीव सप्ताह साजरा केला .

१ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर २०२३ हा सर्व भारतभर वन्यजीव सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो याची दखल घेऊन वनपरिक्षेत्र कार्यालय चामोर्शीचे वनपरिक्षेत्र अधिकारी आर .बी . इनवाते , क्षेत्र सहाय्यक भाडभिडी ( बि. ) व्ही .एस . चांदेकर , वनरक्षक व्ही . जी .लांजेवार आमगाव ( म ) , के . ए . वैरागडे मारोडा , आर . एल . बानोत कर्कापल्ली , एम . एस . कोरवते राजुर , के . डी . नैताम हळदवाही , डी . एम . कुमरे भाडभिडी , माजी उपसरपंच एकनाथजी भुरसे , ग्रा. पं . सदस्य भाऊराव देवतळे , शेडमाके विद्यालयाचे प्राध्यापक किशोर पोहनकर , एस. सेगम , श्रुती मोतकुरवार , गजानन बारसागडे , वनमजूर संतोष इष्टाम , शिडाम आणि शेडमाके विद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते .यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी इनवाते यांनी विद्यार्थ्यांना वन्यप्राण्यांचे महत्व व संरक्षणाचे महत्व पटवून दिले . यासाठी वनविभागाच्या कर्मचार्यांनी व शेडमाके विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले .

## दुर्धर आजाराने त्रस्त नामदेवाच्या मदतीला धावले 'देव'राव

# जिवती येथिल नामदेव पवार यांच्यावर नागपूरला येथे उपचार;सुधीर भाऊ सेवा केंद्रातून मिळाली मदत

**राजुरा । प्रतिनिधी**

सध्या राज्यातील मोठ्या प्रमाणात आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून राजुरा विधानसभा क्षेत्रातील अतिदुर्गम, आदिवासी, मागास तालुका म्हणून ओळख असलेल्या जिवती तालुक्या अंतर्गत येत असलेल्या सेवदासनगर येथील तीस वर्षीय प्रविण नामदेव पवार या युवकाला यकृत आणि मूत्रपिंडाच्या दुर्धर आजाराने ग्रासल्यामुळे त्रस्त होता. आपल्या आजारावर योग्य उपचार मिळावा यासाठी आज (दि. ४) बुधवारला राजुरा येथिल सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्र कार्यालयात येऊन विचारणा केली असता यावेळी उपस्थित राजुरा विधानसभा प्रमुख देवराव भोंगळे यांना भेटून त्यांनी आपली आपबिती सांगितली. यावेळी क्षणाचाही विलंब न करता नामदेव यांच्या मदतीला देव राव धावून येत रुग्णवाहिका उपलब्ध करून त्यांना नागपूर येथे योग्य उपचाराकरिता पाठविण्यात आले.

नामदेव पवार हे मागील काही दिवसांपासून यकृत आणि मूत्रपिंडाच्या दुर्धर आजाराने त्रस्त होते. त्यांना योग्य उपचार मिळत नसल्याने ते इतरत्र फिरत होते. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्र राजुरा या ठिकाणी




आजारावरील योग्य उपचारासाठी मदत मिळतील या आशेने राजुरा येथील सेवा केंद्रात आले. सेवा केंद्रातील उपस्थितांना सबंधित आजारावरील उपचारासाबंधी माहिती घेत असताना भाजपा राजुरा विधानसभा प्रमुख देवराव भोंगळे यांनी त्यांची आस्थेने विचारपूस केली असता नामदेव यांनी आपल्या आजारासाबंधी माहिती सांगितली. या आजारावर योग्य उपचार करण्यासाठी त्यांना नागपूर येथिल शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे जाण्यास सांगितले व तात्काळ रुग्णवाहिका उपलब्ध करून देत त्यांना नागपूर येथे पाठविले. यावेळी आजाराने त्रस्त रुग्णांनी नामदेवाला देव भेटल्याची भावना व्यक्त केली. याप्रसंगी त्यांचे आप्त, भुरकुंड्याचे उपसरपंच अजय राठोड, आदिंची सोबत उपस्थिती होती.

# साऊथचा सुपरहिट चित्रपट 'गीता' आता मराठीत फक्त 'अल्ट्रा झकास' मराठी ओटीटीवर

**मुंबई । प्रतिनिधी**

बेवारस मुलांची कोणी फुकट जबाबदारी घेत नाही. त्यांचं शोषण करून त्यांच्याकडून भरभरून कसा फायदा मिळवता येईल हा विचार समाजातील बहुतांश लोक करत असतात. अशाच बेवारस मुलांच्या शोषणावर आधारित तेलगू चित्रपट 'गीता' आता ९ ऑक्टोबर २०२३ पासून 'अल्ट्रा झकास' या ओटीटीवर मराठीत पहायला मिळणार आहे. चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन 'विश्व आर राव' यांनी केले असून चित्रपटात महाराष्ट्राची 'हेबा पटेल' आणि तेलगू सुपरस्टार 'सुनील' यांनी अभिनय केले आहे. चित्रपटाची कथा गीता या मुलीभोवती फिरते. गीता स्वतः अनाथ असल्याने बेवारस अनाथ मुलांना लोकांनी दत्तक घ्यावं यासाठी प्रयत्न करते.




या दरम्यान भगवान नामक व्यक्ति अनाथ मुलांसोबत काहीतरी चुकीचे करतो आहे याची तिला चाहूल लागते. पोलिसांची मदत घेऊन ती भगवानच्या गैरकृत्याचा पाठलाग करते. मराठी प्रेक्षक फक्त भाषेमुळे जगातल्या उत्तोमोत्तम मनोरंजनापासून वंचित राहू नये म्हणून आम्ही 'अल्ट्रा झकास' या मराठी ओटीटीच्या माध्यमातून 'गीता' सारखे उत्तम चित्रपट मराठी प्रेक्षकांसाठी उपलब्ध करून देत आहोत. असे अल्ट्रा मिडिया अँड एंटरटेनमेंट प्रा.लिमिटेडचे सी.इ.ओ.सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले. बेवारस मुलांच्या शोषणावर आधारित तेलगू 'गीता' चित्रपटासोबतच झकास मनोरंजन, सदाबहार एकापेक्षा एक कौटुंबिक कथा, विनोदासह जबरदस्त ॲक्शन थ्रिलर चित्रपटांतील ड्रामा अनुभवण्यासाठी लगेच डाउनलोड करा 'अल्ट्रा झकास ओटीटी' प आणि तुमच्या कुटुंबासोबत अमर्याद आनंद घ्या अल्ट्रा झकास वरील एचडी कन्टेंटचा.

## माजरी पोलिसांच्या नाकाखाली सुरू आहे अवैध धंदे

**माजरी । प्रतिनिधी**

भद्रावती तालुक्यातील माजरी हे गाव जवळपास २५ हजार लोकवस्ती असलेले सर्वात मोठे गाव आहे. भारतातील सर्वात मोठी कोळसा उत्पादक कंपनी वेकोली याच क्षेत्रात आहे. कोळसा खाणीमूळे येथील भारतातील अनेक प्रांतांतिल लोक वास्त्व्यास आहे मात्र माजरी व परिसरात गुन्हेगारीचे प्रमाण तसेच अवैधरित्या चालणाऱ्या व्ययसायाचे प्रमाण असुन यामध्ये अवैधरित्या खुल्ले आम चालणारे सट्टा, दारू, जुगार, वेकोली क्षेत्रात होणाऱ्या चोऱ्या, अवैधरित्या बाळगले जानारे शस्त्र अश्या अनेक गुन्ह्यांच्या समस्या माजरी मध्ये घडत असतात. तरीपण माजरी पोलिस यावर निर्बंध आणू शकले नाही.

माजरी परीसर हा गुन्हेगारीत अति संवेदनशील आहे मात्र मागील २०१४ च्या दारूबंदी पासून अवैधरित्या चालणारे धंदे जसे खुल्लेआम ठिकठिकाणी चालणारी सट्टा व्यवसाय, अवैध दारूविक्री ,जुगार परिसरात सर्रास चालू आहे. मात्र यावर पोलिस प्रशासनाकडून कोणतीच कारवाई केली जात नाही.दरम्यान मजूर वर्ग बेरोजगारीच्या संकटातून निघण्याच्या हौसेपोटी आपल्या घरातील पैसे नेवून या सट्टापट्टी च्यां नादात घरातील पोराबाळाला उपास घडवीत असल्याचे चित्र ही माजरी च्या कॉलरी परिसरात निर्माण झाले आहे .त्यात शाळकरी मुलेही या सट्टापट्टी च्या व्यवसायात गुरफटलेला दिसून येत आहेत.शासकीय परवानाधारक दारू भट्टी परवान्या नुसार मध्य पेईंना एक दिवस असो किंवा एक वर्ष त्यांना दारू पिण्यासाठी परवाना घ्यावा लागतो व दारूच्या शासकीय दुकानात त्याचा फलक लावावा लागतो पण असला कुठलाही फलक दारू विक्रेत्याकडे दिसत नाही व सर्रास कुठल्याही व्यक्तींना वयोमर्यादा नसतानाही दारू विकली जाते. किरकोळ व्यापारी असताना सुद्धा हे लोक अवैधरित्या दारू विकणाऱ्यांना ठोक भावात दारूच्या पेट्या विकतात.यावर राज्य उत्पादन शुल्क विभाग यांनी तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. माजरी येथील गुन्हेगारीचे प्रमाण लक्षात घेता माजरी परिसरातील सामान्य जनतेच्या मनात भीती निर्माण झाल्याचे दिसून येत आहे आणि मांनवाधिकराचे सर्रास उल्लघन ही होत आहे .अवैध दारू विक्री सकाळी,पहाटे ते रात्री उशिरा पर्यंत अवैधरित्या मद्यप्रेमिना सुरू असते व पाटाळा येथील पोलीस चौकी पासून शंभर मीटरच्या आत अवैधरित्या दारू विकली जाते ही काही पोलिस अधिकाऱ्यापासून लपलेली बाब नाही मात्र यावर कधीही कडक कारवाई का होत नाही हा प्रश्न पाटाळा येथील ग्रामस्थांना पडत आहे . माजरी पोलीस ठाण्यात सध्या स्थितीत कार्यरत असलेल्या ठाणेदारांनी यावर मोठी कारवाई करावी अशी मागणी ग्रामवसियांकडून केल्या जात आहे .

# एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ बल्लारपूर येथे तीन दिवसीय 'मधुमक्षिका पालन' प्रशिक्षणाचे आयोजन

## एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ आणि खादी ग्रामोद्योग आयोगाचा संयुक्त पुढाकार

**बल्लारपूर । प्रतिनिधी**

एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ मुंबईचे महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल, बल्लारपूर जिल्हा चंद्रपूर आणि खादी व ग्रामोद्योग आयोग, विभागीय कार्यालय नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आणि कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०३ ऑक्टोबर ला तीन दिवसीय 'मधुमक्षिका पालन प्रशिक्षण' शिबिराचे उद्घाटन महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल, बल्लारपूर येथे पार पडले.

ग्रामीण महिला आर्थिक आणि व्यावसायिक दृष्ट्या कसे स्वावलंबी बनतील यासाठी एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ नेहमी अग्रेसर असते. विद्यार्थिनींच्या वेगवेगळ्या कलागुणांना वाव मिळावा सोबतच कौशल्यावर आधारित शिक्षण मिळावे आणि उद्योग क्षेत्रात महिलांचा वाटा कसा वाढवता येईल हा यामागचा उद्देश आहे, यामुळे ग्रामीण महिलांचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण होणार आहे.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता




महात्मा गांधी आणि महर्षी कर्वे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली.सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि उद्घाटक म्हणून आवाराचे संचालक डॉ. राजेश इंगोले यांची उपस्थिती होती. सोबतच प्रमुख पाहुणे म्हणून खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचे जिल्हा समन्वयक विजय ठाकरे, मुख्य प्रशिक्षक प्रशांत सावंत आणि अनिता कासार यावेळी सहायक कुलसचिव डॉ. बाळू दत्तात्रय राठोड आणि समन्वयक वेदानंद अलमस्त उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजय ठाकरे यांनी केले यावेळी मधुमक्षिका पालन मुळे होणारे लाभ आणि खादी ग्रामोद्योग आयोगाच्या विविध योजनांची माहिती त्यांनी सर्वांना दिली. कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत डॉ. राजेश इंगोले यांनी व्यक्त केले यावेळी त्यांनी विद्यापीठात आयोजित वेगवेगळ्या उपक्रमाबाबत सर्वांना अवगत केले सोबतच महिलांच्या सक्षमकरणासाठी विद्यापीठ आपल्या गावी येतोय. विविध कौशल्यावर आधारित शिक्षणासाठी पुढाकार घेत असल्याचे सांगितले.तीन दिवस चालणाऱ्या या मधुमक्षिका पालन प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक निर्भरतेचे धडे मिळणार आहे. मधुमक्षिका पालन करण्याचे फायदे सांगितले जाणार आहे. प्रात्यक्षिकच्या व विविध सादरीकरण च्या माध्यमातून हे प्रशिक्षण पार पडणार आहे त्यामुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण यातून नक्कीच होईल.सदर प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन समन्वयक वेदानंद अलमस्त यांनी केले, सदर कार्यक्रमात विद्यापीठाच्या विद्यार्थिनी समवेत परिसरातील ग्रामीण महिलांची उपस्थिती आहे. अनेक ग्रामीण महिलांनी या प्रशिक्षण साठी नाव नोंदणी केली आहे.या प्रशिक्षण कार्यक्रमाचे व्यवस्थापन पार पाडण्यासाठी आवारातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर अधिकारी, कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## नादयोग कथ्थक केंद्राचे चंद्रपूर च्या सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान :आ. किशोर जोरगेवार



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर हे साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रात नेहमीच अग्रेसर राहणारे शहर आहे. अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून चंद्रपूरातील अनेक नामवंत व्यक्तिमत्त्व राष्ट्रीय पातळीवरही गेले आहेत. नादयोग कथ्थक केंद्रानेही चंद्रपूर च्या सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान असुन मृणालिनी खाडिलकर यांच्या संघर्षमय प्रवासातून विद्यार्थिनींनी धडा घेऊन चंद्रपूर चे नाव उज्वल करावे असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

नादयोग कथ्थक केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी आमदार जोरगेवार बोलत होते. यावेळी व्यासपीठावर गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड प्राप्त आचार्य पंडित प्रशांत गायकवाड, डॉ. साल्फळे, प्रा. जयश्री कापसे गावंडे आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलतांना जोरगेवार यांनी नादयोग कथ्थक केंद्राच्या माध्यमातून नृत्य सेवेची सुरु असलेली सेवा ही मनोभावे करा व आपले नाव या क्षेत्रात मोठे करा असे आवाहन केले. पंडीत प्रशांत गायकवाड यांनीही चंद्रपूर मधे सुरु असलेली ही नृत्य साधना आणि त्यासाठी मृणालिनी खाडिलकर या घेत असलेली मेहनत याबद्दल कौतुक करीत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या औचित्याने आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते महाकाली मुर्ती व चुनरी देत मृणालिनी खाडिलकर यांचा त्या करीत असलेल्या कार्याबद्दल सत्कार करण्यात आला.

# लंडनमध्ये उभारणार छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा : ना.मुनगंटीवार

## पारंपरिक मराठमोळ्या पद्धतीने मुनगंटीवार यांचे जल्लोषात स्वागत







**लंडन । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे एक करोड कोहिनूर ओवाळून टाकावे असा राजा होय. जेव्हा गोठ्यातली गाय आणि घरातली माय धोक्यात येते, क्रुरता आपली सिमा ओलांडते तेव्हा एक तर देव अवतार घेतो किंवा शिवबा अवतार घेतात;छत्रपती शिवाजी महाराज आमच्यासाठी देव जरी नसतील तरीही देवापेक्षा कमी नक्कीच नाहीत, या महानायकाचा अश्वारूढ पुतळा लंडनच्या भूमित उभारण्यासाठी मी आणि महाराष्ट्र सरकार पूर्ण सहकार्य करेल, तुम्ही पुढाकार घ्या मी पुतळा देईन अशी ग्वाही राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री ना सुधीर मुनगंटीवार यांनी येथे दिली.

विजापूरचा मुगल सरदार अफजलखानाचा कोथळा ज्या वाघनखांनी महाराजांनी बाहेर काढला ती वाघनखे परत मिळविण्यासाठी ब्रिटनच्या व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट संग्रहालयाशी यशस्वी करार केल्यानंतर ना. मुनगंटीवार यांचा लंडनच्या स्थानिक मराठी बांधवांनी भव्य समारंभ आयोजित करुन सत्कार केला. या सोहळ्यात ते बोलत होते.ना. मुनगंटीवार यावेळी म्हणाले की, मला जेव्हा सूचना केली की लंडन येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा एक सुंदर पुतळा उभा करावा, तेव्हा मला अतिशय आनंद झाला; मी लगेच संमती दिली. यासाठी महाराष्ट्र सरकार पूर्ण शक्तीने तुमच्या पाठिशी उभे राहील. छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रमी विचार विश्वात पोहचावा अशी आमची अपेक्षा आहे. हा विचार जगातील प्रत्येक देशापर्यंत, देशातील प्रत्येक राज्यापर्यंत, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यापर्यंत, जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यापर्यंत, तालुक्यातील प्रत्येक गावांपर्यंत, गावातील प्रत्येक घरापर्यंत, घरातील प्रत्येक आई-बहिणी पर्यंत, पोहचविण्याचा संकल्प शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या ३५० व्या वर्षपूर्तीनिमित्त महाराष्ट्र शासनाने केला आह. यासाठी सर्वांचा सहभाग अपेक्षित आहे असेही ते म्हणाले.लंडनच्या मराठी बांधवांचे आभार मानताना ना. मुनगंटीवार म्हणाले,आयुष्यामध्ये अनेक आनंदाचे क्षण येतात त्यापैकी आजचा एक आनंदाचा क्षण आहे. तुमच्या सर्वांची भेट घेताना, तुमच्याशी संवाद साधताना, तुमचं दर्शन घेताना मलाही मनापासून आनंद होतोय. जगातील १९३ देशात देशांत सर्वांत श्रेष्ठ भारत असून त्यात आमचा महाराष्ट्र महान आहे .ते म्हणाले मी भाग्यवान आहे, सांस्कृतिक मंत्री म्हणून शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षी काम करण्याची संधी मिळाली. हिंदवी स्वराज्यावर आक्रमण करणाऱ्या अफजलखानाची कंबर उखडून टाकण्याचे सौभाग्य मला मिळाले; त्याचे उदात्तीकरण आम्ही सहन करु शकत नाही. आग्र्याच्या किल्यात जेथे महाराजांचा अपमान झाला तेथेच भव्य दिव्य स्वरूपात शिवजयंती साजरी करुन अभिवादन केले, राज्यात ठीकठिकाणी जाणता राजा महानाटय़ाचे प्रयोग असे कितीतरी उपक्रम राबविण्याची संधी मिळाली. आमचा राजा शूर होता, वीर होता, हिंदवी स्वराज्याचा संस्थापक होता; त्यामुळे मराठी मातीशी नाळ जुळलेल्या प्रत्येकाच्या हृदयात फक्त शिवबाच असावा असे आवाहन शेवटी त्यांनी केले.महाराष्ट्र शासनाच्या वतीने सामंजस्य करार करण्यास ना. सुधीर मुनगंटीवार लंडनला येणार हे कळल्यापासूनच स्थानिक शिवप्रेमी मराठी बांधव उत्साहित होते. मंगळवारी दुपारी व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्तुझियम जवळ ना. मुनगंटीवार पोहोचताच पारंपरिक मराठमोळ्या वेषात, ढोलताशांच्या गजरात त्यांचे स्वागत या महाराष्ट्र मंडळाने केले. सामंजस्य करार झाल्यानंतर अतिशय देखणा सांस्कृतिक कार्यक्रम यावेळी आयोजित करण्यात आला; स्फुर्तीगीत, पोवाडा, पारंपरिक नृत्य, छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रसंग अशा विविध छटांचा हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

# गोंडपिपरी तालुक्यात फसव्या योजनांचा भांडाफोड

## शिवसेना(उबाठाचे)होऊ द्या चर्चा उपक्रमाचे आयोजन

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेतून शिवसेना उपनेते मुंबईचे माजी नगरसेवक मनोज जामसुतकर,माजी नगरससेवक सूर्यकांत पाटील,जाधव,शिवसेना जिल्हा प्रमुख संदीप गिऱ्हे,जिल्हा उपप्रमुख संदीप करपे यांच्या मार्गदर्शनात दि.३ मंगळवारी आयोजित 'होऊ द्या चर्चा' उपक्रमातून राज्यसरकारच्या फसव्या योजनांचा आक्सापुर,वढोलीत भांडाफोड करण्यात आला.



राज्यसरकारकडून सर्व सामान्य नागरिकांची कशी फसवणूक होत आहे,महागाईचे चटके,पारित होणाऱ्या अनेक योजना यांचा दुजाभाव त्यापासून वंचित असणारा शेतकरी, शेतमुजर,कामगार ,महिलांवरील अत्याचार,आरक्षण, कंत्राटी भरती,शिवस्मारक साठी दिलेले वचन,कामगार कायद्यात होणारे बदल,महाराष्ट्र बाहेर जाणारे उद्योग,इंधन वाढ,महागाईने त्रस्त झालेली जनता अश्या अनेक विषयावर नागरिकांशी सवांद साधण्यात आला.यावेळी शिवसेना तालुका प्रमुख सुरज माडुरवार,शहर प्रमुख आनंदराव गोहणे,तालुका संघटक शैलेश बैस,युवासेना शहर प्रमुख विवेक राणा,शहर उपप्रमुख रियाज कुरेशी,युवासेना प्रमुख तुकाराम सातपुते,जोगापूर शाखा प्रमुख पंकज डांगी,आकसापूर शाखा प्रमुख दर्शन वासेकर,गोकुळ सोनटक्के,अमिती मारोती भोयर,कार्तिक बटे,तमुस अध्यक्ष संदीप लाटकर,नबात सोनटक्के,उमेश उपासे,किशोर चुदरी,शैलेश चौधरी,विशाल चंद्रगिरीवार,गुरुदास अलोने,बंडू खरबनकर,अक्षय तिवाडे,दिलीप आभारे,सुरज शेंडे,गणपत झगडकर,गणेश भोयर,चरणदास पिपरे,संतोष किरमे,रोहित कोडापे,इंद्रपल वासेकर,साहिल वासेकर,सुमित कुभरे,मयूर सोयाम,निखिल देवतळे,साहिल बटे, उमेश पेंदोर,शुभम चंद्रगिरीवार,निखिल आत्राम,सागर गुरनुले,आशुतोष पेंदोर,बाल्या भड़के,मयविश कतलाम,धीरज कोवे यांच्यासह शेकडो नागरिकांची उपस्थिती होती.

# ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ७५ वर्ष पूर्ण झालेल्या नागरिकांचा सत्कार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरीक संघ तसेच सहायक आयुक्त, समाजकल्याण, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील रामनगर येथे जागतिक जेष्ठ नागरीक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी आमदार किशोर जोरगेवार, डॉ. विकास आमटे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष महादेव पिंपळकर, गोपाळ सातपुते, केशव जेणेकर, पुनम आसेगांवकर, पंढरीनाथ गौरकार आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले, समाजामध्ये ज्येष्ठ व्यक्तीकडे पाहण्याचा व त्यांच्या सोबत संवाद हा तुटत चालल्याचे दिसून येत आहे. ज्येष्ठांचे अनुभव आणि त्यांचे विचार हे समाजाला पुढे नेण्यासाठी प्रभावी ठरतात, त्यामुळे ज्येष्ठांच्या विचारांना व अनुभवांना आजच्या पिढीने महत्त्व देऊन प्रगती साधावी. जीवनाच्या उत्तरार्धात ज्येष्ठांच्या भावना समजून घेणे आजची गरज आहे. ज्येष्ठांचे अनुभव बघता त्यांचे विचार आणि सूचना ह्या अमूल्य आहेत. ज्येष्ठ नागरिक संघामुळे ज्येष्ठ नागरिकांना आपले विचार, भावना व्यक्त करण्याचे व्यासपीठ मिळाले असल्याचे आमदार जोरगेवार म्हणाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष महादेव पिंपळकर यांनी तर संचालन एकता बंडावार यांनी केले. कार्यक्रमाला परिसरातील ज्येष्ठ नागरिकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.



**७५ वर्षे पूर्ण झालेल्या जेष्ठ नागरीकांचा सत्कार :** जागतिक जेष्ठ नागरीक दिनानिमित्त वयाची ७५ वर्षे पूर्ण झालेले केशवराव चौधरी, पुंडलिक जाधव, आनंदराव अगडे, सुभाष वैरागडे, विजय मुक्कावार, शोभाताई पोटदुखे, प्रभाताई गड्डवार, सुमनताई आगलावे आदी जेष्ठ नागरीकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.


# मराठी प्राध्यापक परिषदेचे अधिवेशन नागपूरला होणार

## आभासी पध्दतीने मराठी प्राध्यापक परिषदेची बैठक संपन्न

**नागपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि गोंडवाना विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेची महत्त्वाची बैठक आभासी पध्दतीने नुकतीच संपन्न झाली. परिषदेच्या अधिवेशन स्थळावर प्रदीर्घ चर्चा होऊन आलेल्या अनेक प्रस्तावामधून डॉ. मधुकरराव वासनिक पी डब्ल्यू एस महाविद्यालय नागपूर येथे परिषदेच्या अधिवेशनाचे आयोजन करण्याला कार्यकारिणीने मान्यता दिली. हा प्रस्ताव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील यांच्यावतीने मराठी विभागप्रमुख डॉ. मनीषा नागपुरे यांनी मांडला होता. यावेळी आयोजक म्हणून डॉ. मनीषा नागपूरे यांचे अभिनंदन करण्यात आले. परिषदेच्या संकेताप्रमाणे एक वर्ष गोंडवाना विद्यापीठ तर एक वर्ष नागपूर विद्यापीठ परिक्षेत्रात अधिवेशनाचे आयोजन केले जाते हे महत्त्वाचे.

परिषदेच्या वतीने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि मराठीचा अभ्यासक्रम' या विषयावर चर्चासत्र आयोजित केले जावे अशी भावना यावेळी अनेक सदस्यांनी व्यक्त केली. त्याला तत्काळ प्रतिसाद देत परिषदेचे सचिव डॉ. राजेंद्र वाटाणे यांनी ही जबाबदारी स्विकारून तायवाडे महविद्यालय, धनवटे नॅशनल कॉलेज आणि प्राध्यापक परिषदेच्यावतीने ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात एकदिवसीय चर्चासत्र घेऊ असे त्यांनी सांगितले. यावेळी उद्घाटनाला राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावरील तज्ज्ञ अभ्यासकाला उद्घाटक म्हणून निमंत्रित करावे असा प्रस्ताव डॉ. अजय कुळकर्णी यांनी मांडला. त्याला कार्यकारिणीने संमती प्रदान केली. डॉ. डॉ . नरेंद्र आरेकर आणि डॉ. प्रवीण घारपुरे यांनी या चर्चासत्रात दोन्ही विद्यापीठातील तज्ज्ञ प्राध्यापकाना वक्ता म्हणून निमंत्रित करण्यात यावे असे सुचविले असता परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड यांनी पदवी आणि पदव्युत्तर वर्गावर दोन सत्र आयोजित करण्याची आणि त्यात दोन्ही विद्यापीठातील तज्ज्ञ प्राध्यापकांचा समावेश करणार असल्याची भूमिका मांडली. प्राध्यापक परिषदेच्या वतीने युजिसी केयर लिस्टेड जर्नलचा




विशेषांक प्रकाशित करण्यासंदर्भात डॉ. प्रशांत सूर्यवंशी यांनी मांडलेल्या प्रस्तावालाही सर्व सदस्यांनी सहमती दर्शविली. यांदर्भातील संपूर्ण आराखडा पुढील बैठकीत सादर करण्याची सूचनाही डॉ. सूर्यवंशी यांना करण्यात आली. यावेळी परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड यांनी समयोचित अध्यक्षीय समारोप केला. डॉ. अजय कुळकर्णी यांनी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले. या बैठकीला पूर्वाध्यक्ष डॉ. श्रीकांत नाकडे, कार्याध्यक्ष डॉ. हिराजी बनपुरकर, डॉ परमानंद बावनकुळे, डॉ . विजया गेडाम, डॉ.राकेश खाबे,निहार जाधव, डॉ. राजेश देशपांडे, डॉ. रामलाल चौधरी, डॉ. धनराज खानोरकर, डॉ. नरेंद्र आरेकर, डॉ. अरविंद कटरे, डॉ. पद्मरेखा धनकर, डॉ. राजेंद्र नाईकवाडे, डॉ. विजय राऊत, डॉ . यशवंत घुमे प्रामुख्याने उपस्थित होते.

## अखेर मौलाना अब्दुल कलाम आझाद फलकाला मिळाली रंगरंगोटी

# प्रतिष्ठित व्यापारी खालिद कुरैशी यांच्या हस्ते अनावरण निमित्य भाजपा तर्फे आयोजित सेवा पंधरवाड्याचे

**राजुरा । प्रतिनिधी**

शहरातील मध्यभागी बहुतांश संख्येने वास्तव्याने असलेल्या अल्पसंख्याक मुस्लीम समाजाच्या वॉर्डाला नगर परिषद निर्मितीनंतर भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सहभागी असलेले स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षण मंत्री मौलाना अब्दुल कलाम आझाद यांचे नाव देण्यात आले. यावेळी येथील चौकात एक फलक लावून त्या फलकाला मौलाना अब्दुल कलाम आझाद असे नामकरण करण्यात आले होते. मात्र त्यानंतर त्या फलकाकडे सगळ्यांचे दुर्लक्ष झाल्याने त्या फलकावर लिहिलेले अक्षर मिटून गेल्याने नवीन पिढीला त्या फलकावर काय लिहिले हे माहीत पण नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सेवा पंधरवाडा निमित्त भाजपा राजुरा विधानसभा प्रमुख देवराव भोंगळे यांनी कार्यकर्त्यांसह शहरातील पुतळ्यांना



पाण्याने धुऊन स्वच्छ करणे, चौक, बसस्थानक परिसर स्वच्छ करीत असताना (दि. २) महात्मा गांधी जयंती निमित्य शहरातील मध्यभागी अल्पसंख्यांक समाज बहुसंख्येने वास्तव्याने असलेल्या आझाद चौकात गेले असता चुकतील फलकाकडे लक्ष गेले यावेळी उपस्थितांना हा फलक कशाचा असल्याची विचारणा केली तेव्हा वॉर्डातील नागरिकांकडून हा फलक वार्डाच्या नावाचा असल्याचे सांगण्यात आले. यावेळी देवराव भोंगळे यांनी लागलीच या फलकाला रंगरंगोटी करण्यास सांगितले व त्या परिसरातील स्वच्छता केली. मागील तीस वर्षापासून असलेला मौलाना अब्दुल कलाम आझाद वॉर्डाच्या नावाचा फलक धूळ खात रंग निघालेल्या भग्न अवस्थेत दुर्लक्षित असलेल्या फलकाला रंगरंगोटी केल्याने वॉर्डातील मुस्लीम समाजाच्या नागरिकांनी त्यांचे कौतुक करीत आभार मानले. (दि.३) मंगळवार वॉर्डातील नागरिकांच्या उपस्थितीत रंगरंगोटी केलेल्या फलकाचे अनावरण शहरातील प्रतिष्ठित व्यापारी खालीद कुरेशी यांचे शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी नगर परिषदेचे माजी सभापती राधेश्याम अडाणीया, भाजपा तालुका अल्पसंख्यांक अध्यक्ष सैय्यद शहेजाद अली, सुरेश रागीट, गणेश रेकलवार, अब्दुल सईद कुरैशी, बाबा बेग, विनोद नरेन्दुलवार, सचिन बैस, महेश रेगुंडवार, बंडू कल्लुरवार, भाऊराव चंदनखेडे, निषाद बेग, रज्जाब अली बंदाली, मतीन कुरेशी, मोहम्मद हसन रिजवी, जावेद बेग, सहिद बेग, निषाद बेग, मोहम्मद जमील अंसारी, मोहम्मद कासिम इकबाल शेख, आयुब बेग, शरीफ शेख, छबिलाल नाईक आदींची उपस्थिती होती.

# अरविंदो कंपनीने प्रकल्पग्रस्तांची दिशाभुल करून फसवणुकच केली–डॉ.अंकुश आगलावे

**वरोरा । प्रतिनिधी**

अरविंदो कंपनीने प्रकल्पग्रस्तांची दिशाभुल करून एकप्रकारे फसवणुक केल्याचा आरोप जिल्हा महामंत्री भाजपा ओबीसी डॉ. अंकुश आगलावे यांनी जिल्हाधिकारी चद्रपूर यांना पत्र देवून केला आहे. भद्रावती तालुक्यातील टाकळी जेना – बेलोरा उत्तर आणि दक्षिण कोळसा खाणीचा पट्टा अरविंदो कंपनीला मिळालेला आहे कंपनीने नुकतीच बैठक घेतल्याचे भासवून प्रकल्पग्रस्तांना बाजारभावापेक्षा जास्त मोबदला देवू असे



बैठकीत ठरविले असल्याचे सांगितले. परंतु प्रकल्पग्रस्तांसोबत याबाबत कोणतीही बैठक झाली नसल्याचे आरोप सहा ग्रामपंचायतीच्या प्रकल्पग्रस्तांनी संयुक्त पत्रकार परिषदेत केलेला आहे. अरविंदो कंपनीने २२ लाख रूपये एकरी व प्रकल्पग्रस्तांच्या कुटूंबाच्या सदस्यास नौकरी देण्याचा दावा हा खोटा असून यावर तात्काळ कार्यवाही झाली पाहिजे. कंपनी व प्रकल्पग्रस्तांमध्ये कोणत्याही प्रकारची बैठक झालेली नाही. मागील अनेक महिन्यांपासून प्रकल्पग्रस्तांच्या न्याय व हक्काची मागणी करीत असून प्रकल्पग्रस्तांवर अन्याय होता कामा नये. प्रकल्पग्रस्तांना एकरी एक करोड, एक सातबारावर नौकरी व आणि ज्यांना शेती नाही त्यांच्या आधारे नौकरी देण्यात यावी तसेच प्रकल्पग्रसतांचे पुनर्वसन, प्रदुषण, शेत मजुर, रोजगार, आरोग्य सेवा अशा अनेक रास्त मागण्या कंपनीने तात्काळ पूर्ण करण्याची मागणी डॉ. आगलावे यांनी केली आहे. अरविंदो कंपनी व्यवस्थापाकडून प्रकल्पग्रस्तांन एकरी २२ लाख रूपये व नौकरी देणार असा दावा करण्यात आला मात्र भुसंपादानाकरीता उपविभागीय कार्यालय वरोरा तसेच तहसिल कार्यालय भद्रावती येथे वेळोवेळी घेण्यात आलेल्या बैठकांमध्ये भुसंपानाबद्दल कोणत्याही प्रकारची चर्चा झाली नसल्याचा प्रकल्पग्रस्तांचा आरोप आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .